# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे शहर पोलीस.

THANE POLICE COMMISSIONERATE

प्रेसनोट क्रमांक १ दिनांक– ०२/०४/२०२४

**महामार्गावरून जाणाऱ्या वाहनांना अडवुन वाहन चालकांवर चाकुने वार करून गंभीर जखमी करून लुटणाऱ्या आरोपीतांना शिताफीने अटक**

शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दित दिनांक ११/०३/२०२४ रोजी पहाटे ०३:०० वा. चे सुमारास काटाई–बदलापुर हायवे रोड, म्हाडा सर्कल, आनंदनगर, एमआयडीसी, अंबरनाथ पुर्व येथे फिर्यादी नटवर रामस्वरूप सिंग, वय ३० वर्ष हे त्यांचे ताब्यातील ट्रक घेवुन बदलापुरच्या दिशेने जात असतांना तिन अनोळखी आरोपीत यांनी फिर्यादीचे ट्रकला त्यांची मोटार सायकल आडवी लावुन “ आमच्या गाडीला कट का मारला ?” या कारणावरून फिर्यादी यांचेवर चाकुने वार करून फिर्यादी यांचेकडील ७,०००/–रू. रोख रक्कम, पाकीट, आधारकार्ड, गाडीची चावी बळजबरीने चोरून घेवुन गेले म्हणुन फिर्यादी यांचे तक्रारीवरून गुन्हा रजि.नं. २७५/२०२४ भा.द.वि.कलम ३९७ प्रमाणे दि.११/०३/२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनानुसार नमुद गुन्हयाचा सखोल तपास सुरू करण्यात आला.

सदर महामार्गावर वाहन चालकांचे वाहने अडवुन त्यांचेवर चाकुने वार करून गंभीर जखमी करून पळुन गेलेल्या अनोळखी आरोपीत यांचा शोध घेणेकामी तिन वेगवेगळे पथक तयार करून आरोपीत यांचा शोध घेणेकामी रवाना करण्यात आले. गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोउपनिरी/शेख व त्यांचे पथकातील अंमलदार यांनी गुन्हयाचे घटनास्थळापासुन आनंदनगर एमआयडीसी, पालेगाव नाका, नेवाळीनाका, नांदीवली तेथुन परत नेवाळीनाका, पालेगाव, गायकवाडपाडा, भाटीया चौक, नेताजी चौक, विनस चौक, महादेव मंदीर आशाळेपाडा, उल्हासनगर–४ पर्यंत सलग ०८ दिवस प्रयत्न करून **एकुण ३८ ठिकाणाचे सीसीटीव्ही फुटेज चेक करून** आरोपीत आशाळेपाडा परीसरात गेल्याचे निष्पन्न झाले. मिळालेल्या सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे व गुप्त बातमीदारामार्फत आरोपी १) तुषार दत्ता कडु, २) रोहन वाघमारे, ३) गणेश बिरारे, सर्व राह. आशेळेपाडा, उल्हासनगर–४ हे असल्याचे निष्पन्न करण्यात आले. नमुद आरोपीत यांचेपैकी एक रोहन वाघमारे हा विधीसंघर्षीत बालक असल्याने त्यास दि.२३/०३/२०२४ रोजी ताब्यात घेवुन बाल न्यायालय,भिवंडी येथे हजर करण्यात आले आहे. तसेच दुसरा आरोपी तुषार कडु यास नमुद गुन्हयात दि.२६/०३/२०२४ रोजी अटक करण्यात आली असुन त्याची दिनांक ०२/०४/२०२४ रोजी पावेतो पोलीस कस्टडी मंजुर आहे. आरोपीत यांनी गुन्हयात वापरलेली २५,०००/–रू. किंमतीची होंडा मोटार सायकल जप्त करण्यात आली आहे. तसेच उर्वरीत पाहीजे आरोपी गणेश बिरारी याचा शोध सुरू आहे.

वर नमुद कारवाई मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–४, उल्हासनगर, सहा.पोलीस आयुक्त, अंबरनाथ विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि अशोक भगत, पोनि.प्रदिप सालेकर, पोउपनि/एस.एस.शेख, पोहवा/३११२ सैंदाणे, पोहवा/६३१० पादीर, पोहवा/६३४५ वळवी, पोहवा/१७५३ साळुंके, पोना/७३८९ देवरे, पोशि/३४४८ राजगे, पोशि/१२४९ गडगे यांनी पार पाडून उल्लेखनीय कामगिरी केली आहे.